# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com


क्र.तंशिप्र-१२२१/प्र.क्र.०१७/सीईटी/२०२१/१९८६ दिनांक-२६/११/२०२१.

**शैक्षणिक वर्ष - २०२१-२२ करीता तंत्रशिक्षण विभागांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रथम/दुसऱ्या (अंतिम) फेरीच्या जागावाटप प्रसिध्द झाल्यानंतर प्रवेशाकरीता संस्थेत आलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रिया हाताळण्यासाठी संस्थांकरीता महत्वपुर्ण सूचना**

१. जागावाटप नंतर उमेदवार जागावाटप झालेल्या संस्थेमध्ये विहीत वेळापत्रकानुसार उपस्थित राहील यांची संस्थानी काळजी घ्यावी.

२. संस्थाप्रमुख, प्रत्येक विद्यार्थ्याची अभ्यासक्रमनिहाय पात्रता निकष माहिती पुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे व आवश्यक मुळ प्रमाणपत्र/कागदपत्रांची काळजीपूर्वक पडताळणी करतील व सर्व समाधान झाल्यावर उमेदवाराचा प्रवेश ऑनलाईन प्रणालीत संस्थेच्या लॉगीनमधून ताबडतोब अपलोड करेल. सदर पडताळणी करतांना काही त्रुटी राहिल्यास संस्था व संस्थाप्रमुख जबाबदार राहील.

३. उमेदवारांना प्रवेशासाठी अर्ज सादर करताना जात पडताळणी प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक प्रमाणपत्र या प्रमाणपत्रांची पावती ग्राहय धरण्याचे निर्देश प्रथम फेरीच्या अंतिम दिनांकापर्यंत मुळ प्रमाणपत्रे सादर करण्याच्या अटीवर परवानगी देण्यात आली होती. जे प्रथम फेरीच्या अंतिम दिनांकापर्यंत उमेदवार मुळ प्रमाणपत्र सादर करणार नाहीत अशा उमेदवारांना प्रवेश देऊ नये व त्यांना पुढील फेरीची प्रक्रिया समजवून सांगावी.

४. उमेदवारास प्रवेशाच्या पुष्ठीसाठी ऑनलाईन प्रणालीतून मिळणारी पावती व शूल्क भरल्याची पावती द्यावी.

५. जर एखाद्या विद्यार्थ्याने त्याला झालेल्या जागा वाटपाची स्वत: चुकीच्या पध्दतीने पडताळणी करुन, जागा स्वीकृती करुन संबंधित संस्थेत प्रवेशासाठी हजर झाल्यास अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करण्यात येऊ नये व सदर विद्यार्थ्याला ताबडतोब तक्रार/हरकत नोंदविण्या विषयी मार्गदर्शन करावे.

६. एखाद्या उमेदवारास चुकीचा प्रवेश दिल्यास त्याची जबाबदारी संस्था व संस्थाप्रमुखाची राहील.

७. प्रवेश दिल्यानंतर पुढील काळात जर विद्यार्थ्याने सादर केलेली कोणतीही कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे विधिअग्राहय किंवा खोटी असल्याचे कोणत्याही वेळी संस्थेस आढळून आल्यास संस्था असा प्रवेश ताबडतोब रद्द करेल. तसेच पुढील कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांना कळवून करेल.

८. सर्व संस्थाप्रमुख महाराष्ट्र शासनाकडून वेळोवेळी प्रसिध्दकेलेल्या कोव्हीड-१९ च्या संदर्भातील मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करतील. प्रवेश केंद्रावर सामाजिक अंतर राखणे तसेच त्या ठिकाणी प्रवेशोच्छुक उमेदवार व पालकांची गर्दी टाळण्याचा प्रयत्न करावा.

**९. संस्थेत प्रवेश देण्यापुर्वी उमेदवाराने जागा स्विकृती शुल्क रुपये १०००/- भरल्याची खातरजमा झाल्यानंतरच प्रवेश द्यावा.**

**<u>विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करणे व शुल्काचा परतावा, कागदपत्रे परत करण्याबाबत महत्वाच्या सुचना</u>**

(अ) उमेदवार प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर करील.

उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने विनंती सादर केल्यानंतर उमेदवाराचा प्रवेश रद्द झाला असे समजण्यात येईल.

उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केली किंवा नाही याबाबत काहीही असले तरी संस्था उमेदवाराने प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेली विनंती अंतिम मानेल. अशा प्रकारे जागा रद्द झाल्याने उमेदवार त्या जागेवरील हक्क गमावेल व ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. तदनंतर उमेदवार शुल्क परताव्याचा दावा करु शकेल व प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरित प्रत संस्थेला सादर केल्याच्या दोन दिवसाच्या आत संस्था प्रक्रिया शुल्क म्हणून रुपये १०००/- वजा करुन शुल्क परतावा आणि सर्व मुळ प्रमाणपत्रे उमेदवारास परत करेल.

(ब) वरील (अ) मध्ये नमूद असले तरीही जर सक्षम प्राधिकाऱ्याने निर्धारीत केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकास संध्याकाळी ०५.०० वाजल्यानंतर प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज केला असल्यास उमेदवार सावधता ठेव व्यतिरिक्त शुल्क परताव्यास पात्र असणार नाही.

(क) कोणतीही संस्था ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यासाठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा करण्यात आलेली प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा अभ्यासक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत. अशा प्रकरणात शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही केली जाईल.

(ड) विद्यार्थ्याने कोणत्याही वेळी प्रवेश रद्द केल्यानंतर संस्थेने पुढील वर्षाचे शुल्क मागू नये.+

(इ) वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या संस्था यांचे पालन करणार नाही अशा संस्थेवर नियामानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**सही/-**
**आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**